**<u>नि.दि.दा.क्र.२२४/२००७</u>**
नि.क्र. १०७
दि.२५.११.२०२४

**<u>वादींतर्फे साक्षीदार क्र. २</u>**

नावः– श्रीकांत सुर्यकांत नांदवटे,
वयः– ३६ वर्षे, व्यवसायः– नोकरी,
राहणारः– बारामती, जि. पुणे.

**<u>सरतपास वादींतर्फे विधीज्ञ श्री. एस.जी. नगरकर यांच्यामार्फत शपथेवर सुरुः–</u>**

१. मला कोटार्कडून या केसकामी साक्षी समन्स प्राप्त झाले होते. मी उपाध्यक्ष भूमी अभिलेख, बारामती येथे मे २०१९ पासून कार्यरत आहे. त्याआधी २०१३ ते २०१९ या कालावधीत उपअधिक्षक, भूमी अभिलेख दौंड या कार्यालयात भूकरमाफक या पदावर कार्यरत होतो. प्रस्तुत दाव्यातील कोर्ट कमिशन मोजणीचे काम मला सोपविण्यात आले होते. सदरचे मोजणीचे काम मला वर्ग केल्याबाबत लेखी आदेश मी हजर केलेले आहे. आता मला दाखविण्यात आलेला नि. ५१ वरील कोर्ट कमिशनर अहवाल पान क्र. १ ते ६३ मी न्यायालयात दि. १०.०४.२०१९ रोजी उपअधिक्षक भूमी अभिलेख दौंड यांच्यामार्फत हजर केलेला आहे. सदरचा अहवाल न्यायालयात हजर करण्यासाठी मी उपअधिक्षक भूमी अभिलेख यांना फेब्रुवारी २०१९ रोजी दिलेला होता. आता मला दाखविण्यात आलेला पत्र तोच आहे. त्यावर माझी सही आहे. मजकूर खरा व बरोबर आहे. सदर पत्रास **नि. १०८** देण्यात येत आहे. आता मला दाखविण्यात आलेला आदेश हा भूमी अभिलेख दौंड यांनी या केसमधील मोजणीचे काम मला दिल्याबाबतचे दि. २३.१२.२०१८ रोजीचे आदेशाची प्रत आहे. त्यावर भूमी अभिलेख दौंड यांची सही आहे. ते माझे वरिष्ठ असल्यामुळे मी ओळखतो. त्यास **नि. १०९** देण्यात येत आहे. आता मला दाखविण्यात आलेला दि. २४.१२.२०१८ रोजीचा उपअधिक्षक भूमी अभिलेख यांचा सदर मोजणीबाबत आदेशाची प्रत आहे. त्यावर उपअधिक्षक भूमी अभिलेख सही आहे जी मी ओळखतो. मजकूर खरा व बरोबर आहे. सदर पत्रास **नि. ११०** देण्यात येत आहे. मला देण्यात आलेल्या मोजणीच्या कामी मी वादी, प्रतिवादी आणि लगत कब्जेदारांना नोटीस काढल्या होत्या. सदरच्या नोटीशीच्या प्रती आणि मुळ पोस्टल रिसीट मी माझ्या नि .५१ अहवालासोबत हजर केलेले आहेत. त्यांना जनरल क्लॉजेस ॲक्ट नुसार गृहतक असल्यामुळे एकत्रात **नि. १११** देण्यात येत आहे. सदर नोटीशीप्रमाणे मौजे हिंगणेबेडी येथील गट नं. ५९ आणि ६१ ची मोजणी दि. २३.०१.२०१९ रोजी केली होती. मोजणी करतेवेळी लगतचे गटांची मोजणी सर्वे नंबरची मोजणी करुन करण्यात आली होती. सदरची मोजणी मी उपलब्ध अभिलेख टिपण फाळणी नकाशानुसार केली.

सदरचा फाळणी नकाशा मी माझ्या अहवालासोबत जोडलेला आहे. फाळणी नकाशाच्या आधारे वस्तुस्थितीनुसार मी माझा नकाशा तयार केला होता. आता मला दाखविण्यात आलेला नकाशा मो.र.क्र. ९/१९ तोच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर आणि टिपा वस्तूस्थितीप्रमाणे खरा व बरोबर आहे. त्यास **नि. ११२** देण्यात येत आहे. माझ्या मोजणीनुसार असे निदर्शनास आले आहे की, गट नं. ६१ मध्ये हिरव्या रंगाने दाखविलेले वादीचे क्षेत्र हे प्रतिवादीच्या कब्जे वहिवाटीस दिसून आले. तसेच सदर नकाशा वरुन गट नं. ५९ मधले वादीचे २ आर क्षेत्र प्रतिवादीच्या कब्जे वहिवाटीस दिसून आले. मोजणीच्या वेळी प्रस्तुत असणा–यांचे जबाब नोंदवून माझ्या अहवालाच्या पान नं. ४३ वर हजर केलेले आहे. त्या जबाबावर माझी सही आहे. मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि. ११३** देण्यात येत आहे.

२. सदर मोजणीचे ब आलेख मी न्यायालयात हजर केलेले आहे. परंतु त्याचे अ आलेख आमच्या कार्यालयात उपस्थित नसल्याबाबत आज मी नि.१०३/१ सोबत पत्र हजर केलेले आहे. त्यावर मुख्यालय सहाय्यक उपअधिक्षक भूमी अभिलेख दौंड यांची सही आहे. त्यातील मजकूर आमच्या रेकॉर्डप्रमाणे खरा व बरोबर आहे. त्यास नि. १०४ दिलेले आहे. मी दौंड कार्यालयात असेपर्यंत सदर मोजणीबाबत मला कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही.

**<u>सरतपास पुर्ण.</u>**

**<u>उलटतपास प्रतिवादी क्र. २ तर्फे विधीज्ञ श्री. के. एन. येडे यांच्यातर्फे</u>**

३. हे म्हणणे खरे आहे की, न्यायालयात हजर केलेले नि. ५१ वरील ब आलेख खरा व बरोबर आहे याची खात्री करण्यासाठी आमच्या कार्यालयातील मूळ अ आलेख आज माझ्यासोबत नाही. हे म्हणणे खरे नाही की, ब आलेखातील संपूर्ण मजकूर खोटा आहे. हे म्हणणे खरे आहे की, नोटीस न पाहता करण्यात आलेली मोजणी ही कायदेशीर होत नाही. हे म्हणणे खरे आहे की, गट नं. ५९ च्या शेजारी गट नं. ६० आहे. हे म्हणणे खरे आहे की, गट नं. ६० च्या मालकाचे नाव उपसंचालक, पुनर्वसन जमीन तथा जिल्हाधिकारी पुणे यांचे नाव आहे. हे म्हणणे खरे आहे की, गट नं. ६० च्या मालकाला प्रस्तुत मोजणीची नोटीस पाठवली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, गट नं. ५९ च्या उत्तरेला गट नं. ५७ आहे. हे म्हणणे खरे आहे की, गट नं. ५७ चे ३ हिस्से पडल्याचे मी सांगू शकत नाही. गट नं. ५७ च्या १ चे मालक केरु सावळा नामगोडे असल्याचे मी सांगू शकत नाही. तसेच गट नं. ५७/२ चे मालक कविता आनंद नामगोडे, सविता आनंद नामगोडे, संदिप आनंद नामगोडे, मंजुळा मारुती चव्हाण, कांताबाई बाबासो कारंडे, शांताबाई गोविंद सोनवणे, निशाबाई साहेबराव पासंदे, पार्वतीबाई विठोबा नामगोडे आणि नंदाबाई आनंद नामगोडे यांचे सामाईक क्षेत्र असून त्यांचे उत्तर दक्षिण वहिवाट

असल्याबाबत मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, सदर लगत कब्जेदारांना मी सदरकामी नोटीस पाठवल्या नव्हत्या. साक्षीदार स्वतः म्हणतो की, अर्जात नमूद लोकांनाच फक्त नोटीस पाठवल्या होत्या.

४. गट नं. ५९ ची हद्द मी फाळणीबारा आणि सातबा–यात नमूद क्षेत्राच्या आधारे केली होती. हे म्हणणे खरे आहे की, मी वहिवाटीप्रमाणे मोजणी केली आणि सातबाराप्रमाणे हद्दी निश्चित केल्या. हे म्हणणे खरे नाही की, मी वहिवाटीप्रमाणे हद्दी निश्चित केल्यामुळे त्या कायदेशीर नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, मला मोजणी करतेवेळी मुळ जुने सर्वे नंबरचे हद्दीचे दगड दिसून आले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मूळ सर्वे नंबरचे हद्द निश्चित न झाल्यामूळे मला योग्य कायदेशीर मोजणी करता आली नाही. हे म्हणणे खरे नाही की, वहिवाटीप्रमाणे मोजणी केलेली नसल्यामुळे सदरची मोजणी कायदेशीर नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र. २ याने वादीच्या २ आर क्षेत्रात अतिक्रमण केलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी योग्य पध्दतीने मोजणी केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, आज मी खोटी साक्ष देत आहे.

**वारंवार पुकारुन प्रतिवादी क्र. १, ३ आणि ४ गैरहजर. नि. १०६ अन्वये पारित करण्यात आलेल्या आदेशानुसार प्रतिवादी क्र. १, ३ आणि ४ यांच्याविरुध्द "उलटतपास नाही" असा आदेश पारित करण्यात येतो.**

श्रवणोत्तर स्वीकृत.

sd/–

**(एस. ए. विराणी)**

दिनांकः– २५.११.२०२४.

सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,
दौंड, जि. पुणे.

**<u>नि.दि.दा.क्र.२२४/२००७</u>**

**<u>उलटतपास नि. ११४ च्या आदेशान्वये प्रतिवादी क्र. १, ३ व ४ यांच्यातर्फे श्री. के. व्ही. लोंढे यांच्यामार्फत शपथेवर सुरुः–</u>**

**प्रतिवादी क्र. २ यांनी सदर साक्षीदाराचा दि. २५.११.२०२४ रोजी घेतलेला उलटतपास प्रतिवादी क्र. १, ३ व ४ यांच्या विधिज्ञांनी अंगिकारला.**

५. मी दौंड कार्यालयात ६ वर्षे कार्यरत होतो. हे म्हणणे खरे नाही की, वादी आणि त्याच्या वकिलांना मी वैयक्तीकरित्या ओळखतो. हे म्हणणे खरे नाही की, मोजणी करताना मी लगतच्या धारकांना नोटीस दिली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, गट नं. ५९ च्या पूर्वेला गट नं. ६० असून तो पुनर्वसनातील गट आहे. हे म्हणणे खरे आहे की, मोजणी करतेवेळी पुनर्वसन अधिकारी यांना नोटीस काढली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, गट नं. ६१ च्या उत्तरेला गट नं. ६२ आहे. हे म्हणणे खरे आहे की, गट नं. ६२ चे धारक नामगुडे यांना नोटस काढली नव्हती.

६. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकतीची याआधीदेखील मोजणी झाली होती. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या मोजणीनुसार गट नं. ६१ मध्ये प्रतिवादी क्र. १, ३ आणि ४ यांनी ४ गुंठे इतके अतिक्रमण केल्याचे दिसून येते. तसेच प्रतिवादी क्र. २ याने गट नं. ५९ मध्ये २ गुंठे अतिक्रमण केल्याचे दिसून येते. हे म्हणणे खरे नाही की, वादातील मोजणी ही वादीच्या सांगण्यावरुन करण्यात आली होती. हे म्हणणे खरे नाही की, मी सर्वे रेकॉर्डनुसार मोजणी केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी वहिवाटीप्रमाणे मोजणी केलेली आहे. प्रतिवादी क्र.१ च्या गट नं. ६१ मध्ये ५ ते ६ फूट उंचीवर बांध आहे आणि त्या बांधावर बाभळीची झाडे आहेत अगर कसे हे मी आता सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मोजणीचा मूळ अहवाल आणि त्यासोबतचे कागदपत्र मी याकामी हजर केलेले नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतीची आमच्या कार्यालयामार्फत दोन वेळा मोजणी करण्यात आली आणि दोन्ही मोजणीमध्ये तफावत असल्यामुळे मी केलेली मोजणी ही वादीच्या सांगण्याप्रमाणे केल्याचे निष्पन्न होत आहे. हे म्हणणे खरे आहे की, मोजणी करतेवेळी केलेल्या पंचनाम्यावर लगतचे गट नं. ६२ चे धारक नामगुडे यांची सही नाही. हे म्हणणे खरे नाही की, चुकीच्या पध्दतीने मोजणी करुन आज मी खोटी साक्ष देत आहे.

**<u>उलटतपास पूर्ण.</u>**

**<u>फेरतपास नाही.</u>** श्रवणोत्तर स्वीकृत.

**(एस. ए. विराणी)**

दिनांकः– ०२.०४.२०२५ सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, दौंड, जि. पुणे.